# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २३८–२०१०/ दिनांक :

**<u>केस क्र. २३८/२०१०</u>**

| | |
|---|---|
| श्री. संगोडा बापूराया बिराजदार,<br>रा. संख, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली

**<u>कोरम</u> :–** १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## <u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
( ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल )
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. संगोडा बापूराया बिराजदार, रा. संख, ता. जत, जि. सांगली यांनी ' अ ' फॉर्ममध्ये मंचाकडे दि. ५.१०.२०१० रोजी अर्ज केलेला आहे. घरगुती कनेक्शनसाठी चलनाची रक्कम भरलेली असून एस.ओ.पी. प्रमाणे वीज कनेक्शन मिळाले नाही. वीज कनेक्शन व नुकसान भरपाई मिळावी अशी मंचाकडे मागणी केलेली आहे.तत्पूर्वी सांगली कक्षाकडे तक्रारदाराने घरगुती कनेक्शनचे चलन मिळावे म्हणून तक्रार क्र. ५९८ दि. ५.१२.२००९ रोजी तक्रार केली होती. त्याप्रमाणे सांगली कक्षाने दि. ८.१२.२००९ रोजी आदेश पारीत केला.

सदर तक्रारीची सुनावणी कोल्हापूर येथे दि. १०.११.२०१० रोजी घेण्यात आली. सुनावणीच्यावेळेस ग्राहक गैंरहजर. वि.प.तर्फे श्री. क्षिरसागर, नोडल ऑफीसर, सांगली, श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ हजर. सुनावणीच्यावेळेस वि.प.ने दि. ४.१.२०१० रोजी चलन दिले असून दि. ५.१.२०१० रोजी पैंसे भरुन चाचणी अहवाल दि. १६.१.२०१० रोजी मिळाल्याचे सांगितले. जागेची प्रत्यक्ष पाहणी केली असता ग्राहकाने विद्युत संचाची मांडणी केली नसल्याचे सांगितले.

सुनावणीच्यावेळेस संयुक्त तपासणी अहवाल दि. १८.११.२०१० पूर्वी मंचाला सादर करण्याबाबत वि.प.ला सांगितले होते. त्याप्रमाणे कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ यांनी त्यांचे पत्र क्र. ८०६९ ता. १५.११.२०१० रोजी अहवाल पाठविला तो मंचास दि. १८.११.२०१० रोजी मिळाला. अहवालामध्ये तपासणीची तारीख १९.१.२०१० असून विद्युत साहित्य जोडलेले नसल्याचे नमूद केले आहे. तपासणी अहवालावर दुय्यम अभियंता, संख व लाईनमनच्या सह्या आहेत, ग्राहकाची सही नाही.

प्रथमदर्शनी अ फॉर्म हा मुदतबाह्य व अपूर्ण तपशील असल्यामुळे मंचास तक्रारदाराचा अर्ज फेटाळणे योग्य वाटते का ?

उत्तर : होय

<u>कारणमिमांसा</u>

१) सांगली कक्षाने दि. ८.१२.२००९ रोजी आदेश दिला असतांना मंचाकडे अपील ६० दिवसांत न करता दि. ५.१०.२०१० रोजी करण्यात आले. त्यामुळे अपीलास विलंब झालेला आहे.

२) ‘ अ ‘ नमुन्यातील अर्जात तक्रारदाराने चलन भरणा करणे व चाचणी अहवाल देणेबाबत कोणताही उल्लेख केलेला नाही म्हणजे अर्जाचा तपशील पूर्ण नाही. चलन भरणा केल्याचा पुरावा जोडलेला नाही.

प्रथमदर्शनी अर्ज फेटाळण्यात येत असला तरी तक्रारदाराने वीज जोडणीसाठी वायर फिटींग करुन नवीन टेस्ट रिपोर्ट द्यावा व वितरण कंपनीने त्यांच्या प्राधान्य क्रमाप्रमाणे वीज जोडणी द्यावी असे मंचास वाटते. ‘ अ ‘ फॉर्म अपील हे मुदतबाह्य असल्यामुळे नुकसान भरपाई देणे संयुक्तिक वाटत नाही.

## आदेश

१) तक्रारदाराचा अर्ज फेटाळण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) तक्रारदाराने घरगुती फिटींग करुन नवीन चाचणी अहवाल दिल्यानंतर प्राधान्य क्रमाप्रमाणे वीज जोडणी द्यावी.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( जी. बी. पानकर )
सदस्य सचिव

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.